## संक्षिप्त वृत्त



सोलापूर : फूड फेस्टिव्हलप्रसंगी शफी कॅप्टन, डॉ. म. शफी चोबदार आदी.

### शमा उर्दू शाळेत फूड फेस्टिव्हलचा उत्साह

**सोलापूर :** मजेरवाडी येथील शमा उर्दू स्कूल येथे फूड फेस्टिव्हल पार पडले. यावेळी अध्यक्षस्थानी कुलहिंद उर्दू कॉन्फरन्सचे खजीनदार शफी कॅप्टन तर प्रमुख पाहुणे म्हणून सोशल महाविद्यालयाचे उर्दू विभागप्रमुख डॉ. म. शफी चोबदार, रोटरी क्लब ऑफ स्मार्ट सिटीचे डायरेक्टर म. इक्बाल बागबान, संस्थेचे अध्यक्ष अय्युब अहमद नल्लामंदू आदी उपस्थित होते. प्रारंभी मुख्याध्यापक अबुबकर नल्लामंदू यांनी प्रास्ताविक केले. फूड फेस्टिव्हल यशस्वी करण्यासाठी शाहीन सदाफ, यास्मिन बिजापुरे, दिलशाद नल्लामंदू, जुबैदा सय्यद खान, मेराज अल्लोळी, आसिया नल्लामंदू, कौसर शेख, रेश्मा अरब यांनी परिश्रम घेतले. शाहीन सदाफ यांनी सूत्रसंचान केले. आभार यास्मिन बिजापुरे यांनी मानले.

### प्रा. दर्शन पंडित यांना पीएचडी प्रदान

**सोलापूर :** येथील वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागातील प्रा. दर्शन प्रदीप पंडित यांना मध्यप्रदेशातील सेहोर येथील मन्सरोवर ग्लोबल विद्यापीठाकडून पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली आहे.प्रा. दर्शन प्रदीप पंडित यांनी नेक्स्ट-जेन आयओटी डेव्हलपमेंट : अ कटिंग-एज सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग फ्रेमवर्क विथ ब्लॉकचेन अँड स्मार्ट कॉन्ट्रॅक्ट्स या विषयावर सखोल संशोधन प्रबंध सादर केला होता. या संशोधनात इंटरनेट ऑफ थिंग्ज, ब्लॉकचेन आणि स्मार्ट कॉन्ट्रॅक्ट्स या अत्याधुनिक तंत्रज्ञानांचा समन्वय साधत विकसित करण्यात आलेल्या नव्या सॉफ्टवेअर अभियांत्रिकी चौकटीचा अभ्यास करण्यात आला आहे. भविष्यातील डिजिटल तसेच औद्योगिक तंत्रज्ञानाच्या दृष्टीने हे संशोधन अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. या संशोधनासाठी डॉ. प्रा. पंडित यांना डॉ. मनोज पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. प्रा. दर्शन पंडित यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, प्राचार्य डॉ. विजय आठवले, विश्वस्त, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



### बालसंस्कार शिबिरात पालकांना मार्गदर्शन

**सोलापूर :** सह्याद्री एज्युकेशनल ॲन्ड सोशल फाऊंडेशन संचलित, साई व्हिजन इंग्लिश मिडीयम स्कूल, आहेरवाडी व अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा, आध्यात्मिक व विकास मार्ग दिंडोरी (प्रणित) सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने बालसंस्कार शिबीर पार पडले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक, सोलापूर शाखेचे सेवेकरी वेणुगोपाल यांच्या हस्ते स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तद्नंतर त्यांनी आजच्या मोबाईलच्या जमाण्यात विद्यार्थी संस्कारापासून दूर जात आहे. त्यांच्या समृद्ध जीवनासाठी संस्काराची कशी गरज आहे व ते पालकांनी आपल्या दैनंदिन जीवनात कशा पद्धतीने मुलांना देता येईल याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकास व पंचइंद्रियांच्या विकासासाठी अध्यात्माचा व शारीरिक खेळांचा वापर करून कशा पद्धतीने करता येईल. या कार्यक्रमासाठी शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

### इसबावी येथे पोलीस अधिकाऱ्यास धमकी; एकावर गुन्हा

**पंढरपूर :** बेकायदेशीर वाळू साठ्यावर कारवाईसाठी गेलेल्या उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांना धमकी देऊन शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याची घटना इसबावी येथील जि.प. शाळेजवळ रविवारी दुपारच्या सुमारास घडली. या प्रकरणी पंढरपूर शहरच्या पोलिसांनी नितीन दिगंबर शिंदे (वय २५ रा. इसबावी पंढरपूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या संदर्भात उपविभागीय पोलीस अधिकारी शिवशंकर सोमनाथ हुलजंती यांनी पोलिसात तक्रार दाखल केली. ते रविवारी दुपारी ३ वाजेच्या सुमारास इसबावी येथील अवैध वाळू साठ्यावर कारवाई करण्यासाठी गेले होते.त्यावेळी नितीन शिंदे याने आरडाओरड करीत त्यांना धमकी दिली.असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. महिला फौजदार खडके या पुढील तपास करीत आहेत.




# एसटी बसमध्ये जागेच्या वादातून तुफान हाणामारी

## एसटी व पोलीस प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा प्रवाशांकडून आरोप : प्रवाशांमध्ये घबराट

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

एसटी बसमध्ये बसण्याच्या जागेवरून झालेल्या वादातून प्रवाशांमध्ये तुफान हाणामारी झाल्याची धक्कादायक घटना अक्कलकोट बसस्थानकात घडली. या प्रकाराकडे एसटी प्रशासन व पोलीस प्रशासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा आरोप प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

सोमवार, दि. २२ डिसेंबर रोजी दुपारी साडेचारच्या सुमारास अक्कलकोट येथून स्वारगेटकडे जाणारी एमएच १४ एलएक्स ७४२८ क्रमांकाची एसटी बस बसस्थानकात उभी असताना प्रवासी बसमध्ये चढू लागले. गर्दीमुळे बसमध्ये बसण्याच्या जागेवरून वाद सुरू झाला. पाहता पाहता हा वाद विकोपाला गेला आणि काही प्रवाशांनी परगावाहून स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी आलेल्या भक्तांना बेदम मारहाण केली.

या घटनेमुळे बसमध्ये असलेल्या महिला व लहान मुले प्रचंड घाबरून गेली. महिला किंचाळू लागल्या, तर मुले मोठमोठ्याने रडू लागली. मात्र, या गंभीर प्रकाराकडे बसचे चालक व वाहक यांनी दुर्लक्ष करत बसबाहेर उभे राहून केवळ तमाशा पाहिल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. बसस्थानकातील इतर प्रवाशीही ही हाणामारी पाहत होते, मात्र कोणीही ती सोडवण्यासाठी पुढे आले नाही.

विशेष म्हणजे बसस्थानकातील चौकशी विभागाकडून वारंवार ड्युटीवर असलेल्या पोलिस कर्मचाऱ्याला बोलावण्याचे प्रयत्न करण्यात आले. मात्र, बस स्थानकावर नियुक्त असलेला पोलीस कर्मचारी एसटी बस निघून गेल्यानंतरही घटनास्थळी पोहोचला नाही. भक्तांवर होत असलेली मारहाण थांबवण्यासाठी एसटी व पोलीस प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे.

या हाणामारीने भयभीत झालेले भक्त बसमधून खाली उतरले आणि बसस्थानकाच्या एका कोपऱ्यात उभे राहिले. अखेर त्यांनी एसटी प्रवास टाळत कर्नाटक राज्य परिवहन महामंडळाच्या बसने प्रवास करत अक्कलकोट सोडले. या संपूर्ण घटनेदरम्यान बाहेरगावच्या भक्तांच्या मदतीसाठी कोणीही पुढे आले नाही. स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी अक्कलकोटमध्ये मोठ्या संख्येने भाविक येत असतात. मात्र, अशा प्रकारे भक्तांना बसस्थानकात सुरक्षितता मिळत नसेल, तर अक्कलकोटची प्रतिमा मलीन होण्याची शक्यता आहे. बसस्थानकात यापूर्वीही अशा घटना वारंवार घडत असल्याने प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन योग्य ती सुरक्षा व्यवस्था व शिस्तबद्ध नियंत्रण ठेवावे, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.




अक्कलकोट : एसटी बसस्थानकात हाणामारी पाहण्यासाठी झालेली बघ्यांची गर्दी.

# नित्य शिवआराधनेतून चित्तशुद्धी व परमानंदाची प्राप्ती

## अमृतानंद स्वामी : श्री संगमेश्वर मंदिराचा कळसारोहण सोहळा

**सोलापूर/प्रतिनिधी**

नित्य शिवआराधनेतून चित्तशुद्धी व परमानंदाची प्राप्ती होते, असे प्रतिपादन अमृतानंद स्वामी यांनी केले.

भंडारकवठे येथील श्री संगमेश्वर मंदिराचा कळसारोहण सोहळा बालगाव आश्रमचे परमपूज्य अमृतानंद महास्वामीजी यांच्या हस्ते मोठ्या भक्तिभावात पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

या धार्मिक सोहळ्याला सोलापूर दक्षिणचे आमदार सुभाष देशमुख, कर्नाटक भीमा पाणी संघर्ष समितीचे अध्यक्ष पंचप्पा कलबुर्गी, उमराणीचे महादेव सावकार बहिरगोंडे, भाजप नेते हणमंत कुलकर्णी, सरपंच भीमाशंकर बबलेश्वर, तसेच कळसारोहणाचे मुख्य प्रवर्तक श्रीशैल बहिरगोंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी बहिरगोंडे कुटुंबियांच्या वतीने विधीवत होम-हवन व महापूजा करण्यात आली. त्यानंतर परमपूज्य अमृतानंद महास्वामी यांच्या हस्ते मंदिरावर कळसारोहण करण्यात आले. कळसारोहणानंतर स्वामीजींनी उपस्थित भाविकांना अध्यात्मिक मार्गदर्शन केले. श्रीशैल बहिरगोंडे यांची दीर्घकालीन शिवनिष्ठा आज फलित होत असल्याचे नमूद करत स्वामीजी म्हणाले की, प्रत्येकाने नित्यनियमाने शिव आराधना केल्यास जीवनात शांती व परमानंद प्राप्त होतो.

यावेळी आमदार सुभाष देशमुख यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन निंगराज विंचूरे यांनी केले. शेवटी महाप्रसादाचे वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी यतीन शहा, हणमंत पुजारी, बसवराज कोरे, पिरप्पा कुंभार, सोमनिंग कमळे, बसवराज मुक्काणे यांनी विशेष परिश्रम घेतले.



भंडारकवठे : कळसारोहण सोहळ्याप्रसंगी अमृतानंद महास्वामी, आ. सुभाष देशमुख व भक्त.

### मारहाण करून पत्नीच्या तोंडात विष ओतले

**सोलापूर :** मुलीला लग्न करण्यास तूच बळजबरी केली. या कारणावरून पत्नीला हातपाय धरून मारहाण करीत बळजबरीने तोंडात विष ओतल्याची घटना कारला (ता. तुळजापूर) येथे सोमवारी सकाळच्या सुमारास घडली. लक्ष्मी संजय देवकर (वय ३७, रा. कारला, ता. तुळजापूर) असे जखमी महिलेचे नाव आहे. त्यांना नळदुर्ग येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकिय रुग्णालयात विश्वनाथ चोपडे (भाऊ) यांनी दाखल केले. लक्ष्मी देवकर यांच्या मुलींचे लग्न नुकतेच झाले होते. तुझ्या सांगण्यामुळे मुलीने लग्न केले. असे म्हणत संजय देवकर (पती), रवी देवकर आणि इतर चौघांनी मिळून तिला सकाळी ८ च्या सुमारास मारहाण केली.

# महिलेची छेड काढणाऱ्या आरोपीस कारावास

**सोलापूर/प्रतिनिधी**

शेतात एकटी असलेल्या महिलेची छेड काढल्याप्रकरणी आरोपीस दोषी ठरवित प्रथम वर्ग न्यायालयाने सहा महिने सश्रम कारावास व दंडाची शिक्षा सुनावली आहे.

दि. २९ ऑक्टोबर २०२३ रोजी फिर्यादी महिला या त्यांच्या शेतात असताना आरोपी लक्ष्मण दत्तात्रय माळी (गवळी) याने फिर्यादीच्या उजव्या हाताला पकडून तिच्या मनास लज्जा वाटेल असे कृत्य केले. या घटनेनंतर फिर्यादीच्या सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक नागाबाई गंपले यांनी करून आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले. या प्रकरणाची सुनावणी दि. २२ डिसेंबर रोजी ऐश्वर्या जाधव, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, यांच्या न्यायालयात झाली. न्यायालयाने आरोपी लक्ष्मण दत्तात्रय माळी, (रा. कौठाळी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर) यास दोषी ठरवून ६ महिने तुरुंगवास, ५ हजार रुपये दंड तसेच पिडीत महिलेस ३ हजार रुपये नुकसानभरपाई देण्याची शिक्षा ठोठावली. मूळ फिर्यादी, पंच साक्षीदार व तपास अधिकारी यांची साक्ष महत्त्वाची ठरली. सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता अमोघसिद्ध कोरे यांनी काम पाहिले, तर फिर्यादीतर्फे भडकुंबे वकिल यांनी बाजू मांडली. गुन्ह्यात दोषसिद्धी होण्यासाठी संकेत देवळेकर, उपविभागीय पोलीस अधिकारी, सोलापूर ग्रामीण उपविभाग व राहुल देशपांडे, पोलीस निरीक्षक, सोलापूर तालुका पोलीस ठाणे यांनी मार्गदर्शन केले.

# मनिषा माने-मुसळेचा मोबाईल परत मिळण्याचा अर्ज नामंजूर

**डॉ. वळसंगकर आत्महत्या प्रकरण**

**सोलापूर/प्रतिनिधी**

डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्या प्रकरणातील आरोपी मनिषा महेश माने-मुसळे (वय ५०, रा. सोलापूर) हिचा जप्त मोबाईल व सीमकार्ड परत मिळण्याचा अर्ज जिल्हा न्यायालयाने फेटाळून लावला आहे. न्यायाधीश जे. जे. मोहिते यांनी दि. ९ डिसेंबर रोजी हा आदेश दिला. सरकार पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकिल ॲड. डॉ. प्रदिपसिंग राजपूत यांनी युक्तिवाद करताना सांगितले की, हा मोबाईल गुन्ह्याच्या तपासासाठी अत्यंत महत्त्वाचा पुरावा असून तो आरोपीकडून पंचनाम्याद्वारे जप्त करण्यात आलेला आहे. आरोपीकडून मोबाईलचा गैरवापर होण्याची तसेच पुरावा नष्ट किंवा बदलण्याची शक्यता असल्याने तो परत देता येणार नाही. तसेच मोबाईल आरोपीच्या मालकीचा असल्याबाबत कोणताही दस्तऐवजी पुरावा सादर करण्यात आलेला नाही. तिने ई-मेलद्वारे गंभीर धमक्या दिल्याने डॉ. शिरीष वळसंगकर यांनी सुसाईड नोट लिहून आपल्या परवानाधारक पिस्तुलाने आत्महत्या केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी तिला अटक करण्यात आली होती. सरकार पक्षातर्फे ॲड. डॉ. प्रदिपसिंग राजपूत यांनी काम पाहिले, आरोपीतर्फे ॲड. पी. पी. नवगिरे यांनी बाजू मांडली. तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित शंकर लकडे करीत आहेत.

# बावची विद्यालयात गणितीय मॉडेल्सचे प्रदर्शन

**परंडा/प्रतिनिधी**

येथील बावची विद्यालयात प्रसिद्ध गणिततज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन यांची जयंती म्हणजेच जागतिक गणित दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यालयात विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध गणितीय मॉडेल्सचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थापक अध्यक्ष बिभिषण रोडगे यांच्या हस्ते पार पडले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस थोर भारतीय गणिततज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य नारायण खैरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन व मार्गदर्शन गणित शिक्षक सचिन मोरे, प्रमोद डोके, संदीप अनभुले, गरड व फासे यांनी केले.

प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी गणितातील विविध संकल्पना मॉडेल्सच्या माध्यमातून प्रभावीरित्या सादर केल्या. विद्यार्थ्यांनी तयार केलेली त्रिमितीय आकृती, भूमितीशी संबंधित नमुने व गणिती सूत्रांचे प्रत्यक्ष उपयोग पाहून उपस्थित मान्यवरांनी समाधान व्यक्त केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये गणिताविषयी आवड, जिज्ञासा व वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होतो, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



परंडा : बावची विद्यालयात गणितीय मॉडेल्सचे प्रदर्शन पाहताना मान्यवर.

# तीन वर्षीय चिमुकल्याची गळा दाबून हत्या

**एमआयडीसी पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल**

**सोलापूर :** एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून एक धक्कादायक घटना समोर आली असून, तीन वर्षांच्या चिमुकल्याची गळा दाबून निर्घृण हत्या केल्याप्रकरणी पोलिसांनी एका व्यक्तीविरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी शैनाज जाफर शेख (वय २८ वर्षे) या असून त्या सोलापूर येथील कल्पना नगर, कोंडा नगरजवळील सय्यद पठाण यांच्या घरात भाड्याने वास्तव्यास होत्या. सध्या त्या बसवनगर, जि. विजयपूर (कर्नाटक) येथे राहतात. दि. ११ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२.३० ते १.३० वाजण्याच्या सुमारास, आरोपी मौलाली ऊर्फ अकबर अब्दुलरजाक मुल्ला (वय ४४ वर्षे, रा. विजयपूर, कर्नाटक) याने अज्ञात कारणावरून फिर्यादीचा तीन वर्षांचा मुलगा फरहान याला हाताने मारहाण केली.

त्यानंतर खुनाच्या उद्देशाने चिमुकल्याचा गळा दाबून त्याची हत्या केली, असा आरोप करण्यात आला आहे. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर दि. २२ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ४.०९ वाजता एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# श्री सिध्देश्वर कृषी व औद्योगिक प्रदर्शन २५ डिसेंबरपासून

## एआय तंत्रज्ञानासह ५०० प्रकारच्या गुलाबांचे आकर्षण

**सोलापूर :** ग्रामदैवत शिवयोगी श्री सिध्दरामेश्वर यात्रेचे प्रमुख आकर्षण असलेले आणि शेतकरी व औद्योगिक विकासासाठी वरदान ठरलेले राज्यस्तरीय श्री सिध्देश्वर कृषी व औद्योगिक प्रदर्शन यंदा गुरुवार, २५ डिसेंबरपासून होम मैदानावर भरविण्यात येणार आहे. २५ ते २९ डिसेंबर असे पाच दिवस हे प्रदर्शन चालणार असल्याची माहिती श्री सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी दिली.

कृषी विभाग, आत्मा, जिल्हा परिषद सोलापूर व महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या सहकार्याने तसेच स्मार्ट एक्स्पो ग्रुपच्या व्यवस्थापनाखाली हे प्रदर्शन भरविण्यात येत आहे. यामध्ये सुमारे ३०० स्टॉल्स असणार आहेत. यंदा शेतीतील एआय तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष डेमो शेतकऱ्यांसाठी आकर्षण ठरणार असून ५०० प्रकारच्या गुलाबपुष्पांचे प्रदर्शनही भरविले जाणार आहे. प्रदर्शनाचे उद्घाटन २५ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते होणार आहे. शेतकऱ्यांनी तयार केलेली ५०० प्रकारची दुर्मिळ देशी बियाणे उपलब्ध असणार आहेत.

# आचलगाव-शिंगडगाव-होटगी रस्त्याच्या काँक्रिटीकरणाची मागणी

## माजी सरपंच मल्लिकार्जुन पनशेट्टी यांचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना निवेदन



सोलापूर : आ. सचिन कल्याणशेट्टी यांना निवेदन देताना माजी सरपंच मल्लिकार्जुन पनशेट्टी.

**सोलापूर/प्रतिनिधी**

आचलगाव-शिंगडगाव-होटगी या सुमारे २०.६ किलोमीटर लांबीच्या मुख्य रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाल्याने या मार्गाचे तातडीने काँक्रिटकरण करण्यात यावे, अशी जोरदार मागणी शिंगडगावचे माजी सरपंच मल्लिकार्जुन पनशेट्टी यांनी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, आचलगाव ते शिंगडगाव व पुढे होटगीपर्यंतचा रस्ता सध्या मोठमोठ्या खड्ड्यांनी भरलेला असून वाहनचालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून शाळकरी मुले, शेतकरी, कामानिमित्त प्रवास करणारे नागरिक यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या मार्गावर दिवसभर मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असल्याने केवळ तात्पुरत्या दुरुस्त्या निष्फळ ठरत असून कायमस्वरूपी उपाय म्हणून काँक्रिट रस्त्याची नितांत गरज असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. काँक्रिट रस्ता झाल्यास अपघातांचे प्रमाण कमी होईल, वाहतूक सुरळीत होईल तसेच नागरिकांना दिलासा मिळेल, असेही सांगण्यात आले. या मागणीसाठी शिंगडगावसह परिसरातील शेकडो ग्रामस्थांच्या सह्या जोडून हे निवेदन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना देण्यात आले. संबंधित विभागामार्फत तातडीने पाहणी करून लवकरात लवकर काम सुरू करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.